Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 13 October 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १३ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

माजी राज्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या काल झालेल्या हत्या प्रकारणाचा तपास आज सकाळपासून मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं सुरू केला आहे. पथकानं घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून, ताब्यातील दोन आरोपींची चौकशी सुरू आहे. सिद्दीकी यांच्या हत्येचं कारण शोधण्याचा प्रयत्न पोलिस करीत आहेत. राजकीय नेत्याच्या हत्येमुळं विरोधी पक्षांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बघडला असल्याचा आरोप करताना गृहमंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी केली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुंबईत कोणतीही टोळी पुन्हा सक्रीय होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिसांना दिल्या आहेत. दरम्यान, बाबा सिद्दीकी यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

****

नांदेडच्या एका पोलीस उपनिरीक्षकासह चार ठाणे अंमलदाराना निलंबित करण्याचे आदेश नांदेड पोलीस परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी निर्गमित केले आहेत. शहरातील अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्यासाठी नियुक्त विशेष पथकातील पोलीस अधिकारी-कर्मचारी वाळूमाफियांवर कारवाई न करता त्यांच्याकडून पैसे वसुली करत असल्याची

बाब निदर्शनास आली होती. या पार्श्वभूमीवर या पाच पोलीसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

****

महिला सक्षमीकरण अभियानांतर्गत आज नांदेडमध्ये महिला आनंद मेळावा होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच अन्य मान्यवर उपस्थित राहणार असून महिला भगिनींसह नागरिकांशी संवादाचा हा कार्यक्रम असणार आहे. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील हजारो महिला सहभागी होत असून मुख्यमंत्री युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे लाभार्थीही उपस्थित असणार आहेत.

****

अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिर्डी इथं साईबाबांचा १०६ वा पुण्यतिथी सोहळा साजरा होत आहे. तीन दिवसीय चालणाऱ्या या सोहळ्याचा आज समारोप होत आहे.

विजया दशमीच्या दिवशी साईबाबांनी देहत्याग केला होता. शिर्डीत परवापासूनच विविध धार्मिक विधी आणि श्रीसाई सचरित्र पारायणाला सुरूवात झाली. काल उत्सवाचा मुख्य दिवस होता. दरम्यान, साईबाबांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त मंदिर आणि परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई तसच फुलांची सजावट करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील सावळी विहीर इथं शिर्डी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीचं आणि संरक्षण् विषयक डिफेन्स क्लस्टरचं भूमीपूजन. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झालं. राज्यात पाच ठिकाणी डिफेन्स क्लस्टर सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सामंत यांनी दिली.

****

कोकण,मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

****

भारतानं बांगलादेश सरकारला हिंदू आणि सर्व अल्पसंख्याक आणि त्यांची प्रार्थनास्थळे, विशेषत: सणासुदीच्या काळात सुरक्षितता आणि सुरक्षा करण्याचे आवाहन केलं आहे. एका निवेदनात परराष्ट्र मंत्रालयानं ढाका येथील तंतीबाजार येथील पूजा मंडपावर झालेला हल्ला आणि सातखीरा येथील पूजनीय जेशोरेश्वरी काली मंदिरात झालेल्या चोरीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. हे हल्ले खेदजनक असून मंदिरे आणि देवतांची विटंबना आणि नुकसान जाणीवपूर्वक केलं जात असल्याचं भारताने म्हटलं आहे.

****

माजी राष्ट्रपती डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. यंदाच्या वर्षीही सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयं, शासकीय संस्था, मंडळं, सार्वजनिक उपक्रम कार्यालयांनी विविध उपक्रमांचं आयोजन करावं असे निर्देश शासनानं दिले आहेत. प्रसारमाध्यमांच्या कार्यालयातसुद्धा वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात यावा, असं आवाहन मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉक्टर नामदेव भोसले यांनी केलं आहे.

****

महिला टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाची आज ऑस्ट्रेलियाशी लढत होत आहे. संयुक्त अरब अमिरात-युएईमध्ये शारजाह इथं आज संध्याकाळी साडेसातला हा सामना सुरू होईल.

अंतिम फेरीतील चार संघात स्थान मिळवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं अत्यावश्यक आहे.

****

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला येत्या १६ ऑक्टोबरपासून सुरूवात होत आहे. या कसोटी सामन्यासाठी नुकतीच भारतीय संघाची घोषणा करण्यात आली. या मालिकेसाठी रोहित शर्मा कर्णधार तर जसप्रीत बुमराह उपकर्णधारपदाची धुरा सांभाळणार आहे. या मालिकेतील पहिला सामना १६ ऑक्टोबरपासून बंगळुरू इथं होणार आहे. दुसरा सामना २४ ऑक्टोबरपासून पुण्यात तर तिसरा सामना एक नोव्हेंबरपासून मुंबईत होणार आहे.